प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# तब्बल २६ वर्षांपासून फरार असणारे ताब्यात

## दौंड रेल्वे पोलिसांची कारवाई; रेल्वे प्रवाशांना लुटण्याचा केला होता प्रयत्न

**दौंड : पुढारी वृत्तसेवा**

तब्बल २६ वर्षांपासून फरार असलेल्या दोन सराइतांना दौंड रेल्वे पोलिसांनी कर्जत तालुक्यातील राक्षेवाडी येथून ताब्यात घेतले. सन १९९८ पासून हे दोघे सराईत पोलिसांना गुंगारा देत होते. या दोघांची नावे पिंट्या उच्या नाना काळे (वय ४५, रा. राक्षेवाडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर) आणि सुभान पवार (वय ५५, रा. लोणी देवकर, ता. इंदापूर) अशी आहेत.

याबाबत दौंड रेल्वे पोलिस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र गायकवाड यांनी दिलेली माहिती अशी की, दौंड-सोलापूर रेल्वे महामार्गावर रात्रीच्या वेळेस रेल्वे रुळावर दगड ठेवून मोठा घातपात करून प्रवाशांना लुटण्याचा पिंट्या काळे आणि सुभान पवार यांचा मोठा डाव होता, परंतु तो तेव्हा अयशस्वी झाला. तेव्हापासून म्हणजे सन १९९८ पासून हे दोघेही फरार होते. अनेक वर्षांपासून पोलिस त्यांच्या मागावर होते. परंतु पोलिसांना गुंगारा देण्यात ते यशस्वी होत होते.



तब्बल २६ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपींसमवेत दौंड रेल्वे पोलिसांचे पथक. (छाया : उमेश कुलकर्णी)

दरम्यान दौंड रेल्वे पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक राजेंद्र गायकवाड यांनी एक नामी शक्कल लढविली. एका शासकीय योजनेचे अधिकारी बनून ते साध्या वेशात राक्षेवाडी येथे पोहोचले. आरोपी पिंट्या काळे याची बायको हिला आम्ही एका शासकीय कामासाठी आलो आहोत असे पोलिसांनी सांगितले. तिने लगेचच आपला पती घरात असल्याचे सांगताच पोलिसांनी पिंट्याला पोलिसांच्या गाडीजवळ आणत अटक केली. याचवेळी राक्षेवाडीतच असलेला त्याचा सहकारी सुभान पवार यालादेखील अटक केली.

पुणे रेल्वे लोहमार्गाचे पोलिस अधीक्षक तुषार जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली दौंड गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस हवालदार आनंद वाघमारे, नरेंद्र पवार, मनोज साळवे, पुणे गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस निरीक्षक इरफान शेख यांनी ही कामगिरी केली.

दरम्यान या दोघांना दौंड रेल्वे न्यायालयात उपस्थित करण्यात आले असता त्यांना १८ सप्टेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी देण्यात आली. त्यानुसार त्यांची रवानगी येरवडा कारागृहात करण्यात आली.